मंगळवार दि.२९ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ५५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड **लोकनेता**
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# संजय भाऊ दौंड पूर्ण ताकतीने धनंजय मुंडेंच्या पाठीशी-संयुक्त पत्रकार परिषदेत दिली माहिती

## माझ्यात आणि संजय भाऊंमध्ये कोणतेही मतभेद किंवा मनभेद कधीच नव्हते-धनंजय मुंडे

## धनंजय मुंडे माझे बंधू, त्यांची निवडणूक मी माझी समजून पूर्ण क्षमतेने प्रचार करणार-संजय भाऊ दौंड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

माजी आ.संजय भाऊ दौंड यांनी महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या पाठीशी सर्व ताकदीने उभे राहण्याचा निर्णय घेतला असुन, ते आजपासूनच धनंजय मुंडे यांच्या प्रचारात सक्रिय होणार असल्याचे आज धनंजय मुंडे व माजी आ.संजय भाऊ दौंड यांनी आज संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले आहे.माजी आ.संजय भाऊ दौंड हे विधानसभा निवडणुकीत इच्छुक असून, ते धनंजय मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढवतील का, या चर्चेला आता पूर्णविराम लागला आहे.

२०१४ व २०१९ या दोनही विधानसभा निवडणुकीत आम्ही दोघे सोबत होतो. एकदिलाने आम्ही एकत्र काम केले. २०१९ च्या निवडणुकीत मी विजयी झालो, त्यात संजय भाऊंचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनंतर संजय भाऊंना पण विधानपरिषद सदस्यत्वाची संधी मिळाली. आता पुन्हा मी विधानसभा निवडणुकीत सामोरा जात आहे, तेव्हा संजय भाऊ हे पूर्ण ताकदीने माझ्या सोबत आहेत, याचा मला मनापासून आनंद आहे, असे धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे. आगामी काळात पक्ष संजय भाऊंना आणखी उत्तम संधी मिळवुन देईल, असा विश्वासही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. धनंजय मुंडे हे माझे बंधू आहेत. मागच्या आठवड्यात मी माझ्या सहकाऱ्यांशी चर्चा केली आणि आज धनंजय मुंडे यांच्या पाठीशी उभा राहण्याचा निर्णय मी जाहिर करत आहे. धनंजय मुंडे यांची ही निवडणूक ही माझी निवडणूक आहे, असे समजून मी पूर्ण क्षमतेने प्रचाराच्या मैदानात उतरणार असल्याचे माजी आ.संजय दौंड यांनी यावेळी बोलताना सांगितले. मुंडे-दौंड कुटुंबातील स्नेह कधीच कमी होणार नाही, आम्ही कायम एकदिलाने काम करत राहू, असेही धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, शिवाजी सिरसाट, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वाम्भर फड, रणजित लोमटे, राजवर्धन दौंड यांसह प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.



# दक्षता जनजागृती सप्ताह,नांदेड २८ आक्टोबर ते ३ नोव्हेंबर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

## लाच घेणे व देणे गुन्हा आहे




भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे संपर्क करा. मित्रहो, उठा आपण सर्व मिळून भ्रष्टाचाराविरुध्द लढाई एकत्रपणे लढू या, या लढाईसाठी आपल्याकडून आम्हास सक्रिय सहभागाची अपेक्षा आहे. भ्रष्टाचार संदर्भात आपल्या तक्रारी आमच्याकडे घेवून या, आपणास योग्य मार्गदर्शन केले जाईल, आम्ही आपल्या सेवेत सदैव तत्पर आहोत.

महाराष्ट्रातील जनतेच्या सोईसाठी महाराष्ट्र शासनाने १०६४ हा टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे. या क्रमांकाव्दारे आपण लोकसेवकाविरूध्द भ्रष्टाचाराबाबत फोन करू शकता सदर टोल फ्री क्रमांकाची सेवा आपल्या करीता २४ तास सुरू आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केल्याचे फायदे भ्रष्टाचारी लोकसेवक पकडले जावून त्यास न्यायालयातुन शिक्षा होते. कुठलेही काम लवकर होते, अपूर्ण अवस्थेत काम असेल तर ते काम पूर्ण होण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी पाठपुरावा करतात. वारंवार कोर्टात अगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागात हेलपाटे घालावे लागत नाहीत.स्वतःचा वकील नेमावा लागत नाही.

काही दिवसानंतर लाचेची रक्कम परत मिळते.तक्रारीची/तक्रारदाराची संपूर्णपणे गुप्तता पाळली जाते.तक्रारी संदर्भात योग्य ते मार्गदर्शन मिळेल.तक्रारदारास पुर्णपणे संरक्षण दिले जाते.आता आपण आपली तक्रार आपले मोबाईलवरून सुध्दा रललारहरीरीहींर.पशीं या संकेत स्थळावर नोंदवू शकता.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई झाल्यानंतर तक्रारदार यांचे प्रलंबित कायदेशिर काम पूर्ण करून देण्याची हमी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग देते.आपणास योग्य मार्गदर्शन करून भ्रष्टाचारास आळा घालू. आम्ही भ्रष्टाचारास प्रतिबंध करण्यास कटीबध्द आहोत.लोभी, भ्रष्टाचारी व्यक्तीस धडा शिकवा, अन्याय सहन करणे म्हणजे भ्रष्टाचाराला मुक संमती देण्यासारखे आहे. शासकीय लोकसेवकांना दरमहा वेतन मिळत असते. आपल्या एखाद्या शासकीय कामाकरीता आपली अडवणूक होत असेल व लाचेची मागणी (पैशाच्या, बक्षीसाच्या स्वरूपाने) होत असेल तर तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क करा. पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग स्नेहनगर, पोलीस कॉलनी, मेन रोड, नांदेड-४३१६०२ दुरध्वनी क्र. (०२४६२) २५३५१२ मो.नं.९८७०१४५९१५

# हजारो समर्थकांच्या साक्षीने डॉ.गोपाल बछिरे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

मेहकर हजारो समर्थकांच्या साक्षीने डॉ. गोपाल बछिरे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल आज मेहकर येथील निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला

डॉ. बछिरे हे नाव म्हणजे एक आंदोलक एक संघर्ष करता शेतकरी, कष्टकरी, युवा बेरोजगार, महिला, दिव्यांग व अल्पसंख्यांकांच्या हक्कासाठी भांडणारे त्यांना न्याय मिळवून देणारा असा योद्धा म्हणून त्यांची ओळख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. बछीरे यांनी जेव्हा मतदार संघातून शिवसेना आपलं अस्तित्व शोधत होती अशा पडतिच्या काळात शिवसेनेचे संघटन पुनर्बांधणी केली, शिवसेनेला नव संजीवनी दिली आणि ऐनवेळी विधानसभेचे त्यांचे तिकीट कापण्यात आले आज त्यांनी हजारो समर्थकांची रॅली काढून आपले शक्ती प्रदर्शन केले व अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे त्यांची लोकप्रियता पाहून उद्याच्या विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल कसा येईल याविषयी सूत्रांच्या माहितीने कळते ही निवडणूक प्रस्थापित व राजकीय पक्षाच्या उमेदवारांना सोपी जाणार नाही.

## दरबार ए शायरी

**सामान्य ज्ञान मतदारांसाठी..**

**खोके-बत्तिसी, कार्यकाल-**
**समृध्दी, नियोजन-नैमित्तिक,**
**आतिथ्य-सार्थार्थ, निर्वाचन-**
**नजराणा, स्थानांकन-बिदागी,**
**स्थानांतरण-सानुग्रह,**
**मुखशुध्दक-चंची,**
**स्वेच्छा-बक्षिसी.....**
**इत्यादी निधींचे काय.....?**
**माझ्या अल्प ज्ञानानुसार**
**सत्तासंवर्धित व**
**वरिष्ठवरदहस्तप्राप्त मंडळींबाबत**
**हे अर्थालंकार अगम्य पण**
**सहजाभिमुख विचरणीय**
**ठरतात.....**
**असो.....**
**संशोधक प्रतिक्रियापेक्षेत.....**

डॉ.विजयकुमार कस्तुरे,
ॲडव्होकेट, चिखली.

## चारोळी

दिवाळी सण येता
येई आनंदाला भारती
एक होई सारे जण
मग भेदभाव कशास उरती.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## फटाकेमुक्त व प्रदुषणमुक्त दिपावली साजरी करावी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**



दिपावली हा सण वर्षाचा मोठा आहे. तरीही जनतेने फटाकेमुक्त व प्रदूषणमुक्त म्हणजेच पर्यावरणीय व आरोग्यदायी दिपावली साजरी करावी असे अव्हान माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड. चे संस्थापक अध्यक्ष वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केले आहे. फटाक्यांच्या अतिशबाजीमुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. प्रदूषण दुषित झाल्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होते. वातावरण, हवा दुषित होते, माणवासह सृष्टीवरील सर्व जीव - जंतुना मोठ्या प्रमाणात हानी पोहचते. फटाके फोडताना अनेक बालके, युवक, वयस्कर व्यक्ती व मुली - महिलांनाही शारीरीक इजा पोहचते, व दुरगामी परिणाम होऊन अनेकांना कायमचे अपंगत्व येते, कोणाचे डोळे, कान, नाक, हात, पाय निकामी होऊ शकतात. केवळ फटाके फोडल्यामुळे पर्यावरणासह,माणवासह सर्व जिवजंतून प्रदुषणाला बळी पडावे लागते. जनतेने या बाबतीत सजग, साक्षर, व सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करावा पर्यावरणीय व प्रदूषण मुक्त दिपावली मोठ्या उत्साहात साजरी करावी असे अवाहन वसुदेव( बप्पा ) गायकवाड यांनी केले आहे.

## ॲड.चंद्रसेन पाटील यांची उमेदवारी दाखल

# विजय संकल्प रॅलीला अभुतपूर्व प्रतिसाद:प्रा.हाके,अमन आंबेडकर, नवनाथ वाघमारे यांची उपस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी ओबीसी बहुजन आघाडी, रिपब्लिकन सेना, बहुजन रिपब्लिक सोशॉलिस्ट पार्टी, लोकराज्य पार्टी, जनहित लोकशाही पार्टीचे अधिकृत उमेदवार ड.चंद्रसेन पाटील सुरनर यांनी मंगळवारी, २९ ऑक्टोबर रोजी सकाळी प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीत व ढोलताशांचा गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत शक्तीप्रदर्शन करीत नामांकन अर्ज दाखल केले आहे. यावेळी ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके, रिपब्लिकन सेनेचे युवा नेते अमन आंबेडकर, ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांची विशेष उपस्थिती होती.

माळाकोळी गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य ओबीसी नेते चंद्रसेन पाटील हे मागील वीस वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहेत. माळाकोळी गटाचे सदस्य असताना आपल्या कामाची चुणुक त्यांनी जिल्हाभर दाखवली आहे. ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी लढा उभारला आहे. ओबीसी आरक्षण संरक्षणासाठी लढा उभारलेले प्रा.लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्या आंदोलनात चंद्रसेन पाटील यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. चंद्रसेन पाटील यांनी वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी मागणी केली होती. मात्र उमेदवारी मिळाली नाही. मात्र तरीही ते मोठ्या ताकतीने निवडणुक रिंगणात उतरले आहेत. त्यांना ओबीसी नेते लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांची खंबीर साथ मिळत आहे. ओबीसी बहुजन आघाडी, रिपब्लिकन सेना, बहुजन रिपब्लिक सोशॉलिस्ट पार्टी, लोकराज्य पार्टी, जनहित लोकशाही पार्टी या आरक्षणवादी आघाडीने त्यांना उमेदवारी दिली आहे. मंगळवारी, २९ ऑक्टोबर रोजी नामांकन दाखल करण्यासाठी काढण्यात आलेल्या विजय संकल्प रॅलीत लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघातून नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




# किनवट माहुर विधानसभा मतदारसंघातून मा.आ.प्रदीप नाईक यांनी केला उमेदवारी अर्ज दाखल



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । योगेश चव्हाण**

किनवट/माहुर विधानसभेतून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व शिवसेना उद्धव ठाकरे गट तसेच मित्र पक्ष अधिकृत उमेदवार श्री.मा.आ.प्रदीप नाईक साहेबांनी हजारो कार्यकर्त्यांच्या सोबत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

# कंधार लोहा मतदार संघाचे वाटोळे होऊ नये म्हणून विधानसभा निवडणुक लढवत आहे–चिखलीकर

## मा.खा.चिखलीकरांचे अभुतपुर्व शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

लोहा–कंधार विधानसभा मतदार संघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.उपजिल्हा रुग्णालयाच्या जुन्या इमारती समोरील मैदानावर मिरवणुकीपूर्वी जाहीर सभा झाली. विधानसभा मतदार संघातील मतदाराच्या अलोट गर्दीने मैदान भरले होते,सगळीकडे माणसंच माणसं होते लाडक्या बहिणीची लक्षणीय उपस्थिती होती.आयोजित सभेच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धर्माधिकारी, व्यासपीठावर उमेदवार
माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर,भाजपाचे श्रावण पाटील भिलवंडे,माजी नगराध्यक्ष कल्याणराव सूर्यवंशी,चैतन्यबापू देशमुख भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रणितातार्ड देवरे चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर,भाजपा जिल्हाध्यक्ष देशमुख, प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पिरिप प्रदेश उपाध्यक्ष बाबुराव गजभारे, रिपाई चे जिल्हाध्यक्ष मिलिंद शिराढोणकार,माणिकराव मुकदम , केरबाजी बिडवई आनंदराव शिंदे, सचिन पाटील चिखलीकर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब कऱ्हाळे,किरण वट्टमवार, केशवराव मुकदम, करिम शेख, छत्रपती धुतमल,मिलिंद पवार राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष मनोहर पाटील, बाबुराव गिरे, नरेंद्र गायकवाड , शोभाताई बगडे,भाजपा जिल्हाध्यक्षा चित्रारेखा गोरे यासह मान्यवर उपस्थित होते.उपस्थित सभेला संबोधित करताना प्रतापराव पाटील म्हणाले, की राजकीय संघर्ष माझ्या आयुष्यला कायम पुंजलेला आहे.त्यामुळेच मला पक्ष बदलावे लागत आहेत.मी पुढील निवडणुकीत राहील अथवा न राहील पण येथील जनतेनी मला नेहमीच तळहातासारखे जपले आहे.पक्ष बदलला तरीतुमची साथ नेहमीच राहिली आहे.देशाच्या सर्वोच्च सभागृहात गेलो तो केवळ तुमच्यामुळेच लोहा कंधार माझे कुटुंब आहे,आपल्या सुखदुःखात आम्ही नेहमीच सहभागी होतो.कोण काय



बोलते याकडे लक्ष देऊ नका वीस दिवस डोळ्यात तेल घालून दक्ष रहा. पंतप्रधान मोदी, राज्य सरकारने ज्या योजना राबविल्या त्या लोकांपर्यंत न्याव्यात. तसेच लाडकी बहिणी योजनेचा लाभ सर्व बहिणींना मिळत आहेत काँग्रेसचे सरकार आले तर ही योजना बंद होईल तेव्हा सर्वांनी मतदान महायुतीला करावे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घडीला मतदान करावे असे आवाहन प्रतापराव यांनी केले.यावेळी वसंत सुगवे धर्माधिकारी बापूराव गजभारे, प्राणिताताई देवरे, वारकड गुरुजी,यासह मान्यवरांची भाषणे केले संचलन भास्कर पवार, बी.डी जाधव यांनी केले.निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांच्याकडे प्रतापराव पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला सोबत माजी नगराध्यक्ष कल्याणराव सुर्यवंशी वसंत सुगावे, माणिकराव मुकादम करीम शेख, आनंदराव पाटील उपस्थित होते.

> **“ उपजिल्हा रुग्णालय जुनी इमारत ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा या मार्गावर भव्य रॅली वाजतगाजत निघाली.मतदारात प्रचंड उत्साह होता.अलोट अभूतपूर्व मतदारांची गर्दी उत्साह दहा वर्षानंतर मा.खा. चिखलीकरांचे शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी दाखल.खासदार डॉ गोपछडे यांनी रॅलीला संबोधित केले व प्रतापराव पाटील यांना विजयी करावे असे आवाहन केले.**

# राहुल कुल यांचे जोरदार शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज केला दाखल

## आतापर्यंत झालेल्या सर्व सभांच्या गर्दीचा मोडला रेकॉर्ड !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

संपूर्ण पुणे जिल्ह्यात महत्त्वाचा असलेल्या दौंड विधानसभा मतदारसंघातून दौंड चे विद्यमान आमदार व महायुतीचे उमेदवार राहुल कुल यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी विधान परिषद सदस्य गोपीचंद पडळकर,योगेश टिळेकर, प्रदेश उपाध्यक्षा कांचन कुल,भाजपा पुणे दक्षिणचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे उपस्थित होते.



दौंड तालुक्यातील चारही बाजूने कानाकोपऱ्यातून कार्यकर्ते एकत्र येत दौंड शहरामध्ये छ.शाहू महाराज स्मारक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत रॅली काढून जोरदार शक्तीप्रदर्शन करीत अर्ज दाखल केला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर शिवाजी चौकात सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गेल्या ३५ वर्षापासून कुल कुटुंबीय हे जनतेची सेवा करत असून दौंड तालुक्यातील जनतेने साथ दिल्याबद्दल तर स्वर्गीय आमदार सुभाष कुल यांच्या अचानक जाण्याने गेल्या २४ वर्षांपासून आपण माझ्यासारख्या तरुणाच्या हातात सत्ता दिल्याने आभार व्यक्त करत सभेला संबोधीत केले. समोर काहीच नसताना आपलीच मते त्यांना पडतात ही सल कायम असायची परंतु आजची गर्दी पाहून ती देखील दूर झाल्याचे राहुल कुल यांनी सांगत आपल्या भावना व्यक्त केल्या.

गेल्या दहा वर्षांपासून समाजासाठी सातत्यपूर्ण कामे केली असून गेल्या अडीच वर्षात सक्षमपणे केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनेक योजना सक्षम राबविल्या आहेत. सकाळपासून रात्रीपर्यंत फक्त नागरिकांचा प्रश्न सोडवण्यासाठीच विचार चालू असतो २४ वर्षापासून सर्व जाती बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला,असून इतरांवर टिका करणे ऐवजी सतत सकारात्मक कामे करण्याचा प्रयत्न केला आहे.

महाविकास आघाडीच्या यादीत अनेक उमेदवारांची नावे नव्हती ऐनवेळी एबी फॉर्म देण्याची वेळ महाविकास आघाडीवर आली,गेल्या दहा वर्षात तालुक्यातील केलेल्या विकास कामाची माहिती देत शहरातील अनेक कामे केली असून काही अपूर्ण आहेत, ही कामे देखील लवकरच पूर्ण केले जातील, येणाऱ्या पाच वर्षात पुढील पन्नास वर्षात तालुक्याला पाणी कमी पडणार नाही याची काळजी घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. दहा वर्षात सातत्यपूर्ण कामे केलेली असून यापुढे महाराष्ट्रात दौंड तालुका अग्रगण्य म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार असून दहा वर्षात कोणाचाही दुजाभाव केला नाही,म्हणूनच मतदारांनी देखील जातपात न पाहता मतदान करा असे आवाहन आमदार राहुल कुल यांनी केले. यावेळी काही दिवसांपूर्वी महाविकास आघाडीची हवा होती परंतु ती ही कमी झाली असून राष्ट्रवादी काँग्रेसची शेवटची निवडणूक आहे,तर काँग्रेस ही इंग्रजांची पार्टी असून काँग्रेसमध्ये फक्त प्रस्थापितांनाच स्थान आहे. अशी टीका गोपीनाथ पडळकर यांनी केली. आजची गर्दी पाहून राहुल कुल यांचा विजय निश्चित असल्याचे सांगितले.राहुल कुल हे ओबीसी व धनगर समाजाच्या प्रश्नासाठी कायम बरोबर असतात म्हणून आपण देखील ठामपणे राहुल कुल यांच्या पाठीशी रहा असे आवाहन पडळकर यांनी केले. यावेळी योगेश टिळेकर,प्रेमसुख कटारिया, वासुदेव काळे,नंदू पवार आदींनी मनोगत व्यक्त केले.यावेळी भारतीय जनता पार्टी यांसह महायुतीतील पक्षांचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राहुल कुल हे गेल्या २४ वर्षांपासून राजकारणात सक्रिय असून भीमा पाटस सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, गेल्या दहा वर्षांपासून आमदार असल्याने मतदारसंघात उत्तम पकड आहे.मागील दोन्ही निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश थोरात यांचा पराभव केला असून आता तिसऱ्यांदा ते निवडणुकीला सामोरे जात असून यावेळी देखील माजी आमदार रमेश थोरात यांच्यासोबत सामना होणार आहे. विद्यमान व माजी आमदार असा हा सामना दौंडमध्ये होणार असून यावेळी कोण बाजी मारणार हेदेखील पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## सर्व ताकदीनिशी लढण्याचा कार्यकर्त्यांचा बैठकीत निर्धार

# आष्टी येथे ६ नोव्हेंबरला व्यापक सभेत प्रचाराचा नारळ फोडणार

## आता सुट्ट–सुट्टच खेळू–मा.आ.भीमराव धोंडे म्हणाले..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेले आणि मतदारसंघाच्या विकासाचे महामेरू माजी आ.भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत सर्व ताकदीनिशी उतरण्याचा निर्धार केला असून कसल्याही परिस्थितीत विजयश्री खेचून आणायचाच असा निर्धार केला तर,मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आता तुमच्या म्हणण्याप्रमाणे सुट्ट - सुट्टच खेळूयात,पाहु मतदार कोणाला कौल देतात ते कळेलच,तसेच आष्टी येथे ६ नोव्हेंबर रोजी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मतदारांची जाहीर सभा घेऊन प्रचाराचा नारळ फोडण्यात येणार आहे असे माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले.

याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे,जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर,माजी जि.प.सदस्य अशोक सव्वाशे,माजी सभापती साहेबराव म्हस्के,माजी जि.प. सदस्य अनुरथ सानप,माजी सरपंच बाळासाहेब पवार,
जेष्ठ नेते बबनराव झांबरे,जि. प. सदस्य रामराव खेडकर,माजी सरपंच बबनराव औटे,माजी सभापती नियामत बेग, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे,युवराज सोनवणे,जि.प.सदस्य रामदास बडे,देविदास शेंडगे,ड.रत्नदिप निकाळजे,हरिभाऊ तांदळे व इतरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे सांगितले की, मी १९८० सालच्या निवडणुकीतही मी अपक्ष उमेदवार होतो व माझ्यासमोर आजी आणि माजी आमदार उमेदवार होते त्यावेळी मी मोठ्या मतांच्या फरकाने विजयी झालो होतो.आजही तीच परिस्थिती आहे त्यामुळे माझा विजय निश्चित आहे आणि मतदारसंघातील दहशत कमी करण्यासाठी सर्वांनी एक दिलाने काम करण्याचा सल्ला माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दिला.यावेळी कालच दुःखत निधन झालेले मतदारसंघाचे माजी आमदार निवृतीराव उगले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कै.निवृत्तीराव उगले हे अतिशय सरळ आणि विकासाची दृष्टी असलेले व्यक्तिमत्व होते असे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले.यावेळी माजी जि.प. सदस्य अशोकराव सव्वाशे यांनी सांगितले की माजी आ.भीमराव धोंडे यांना या निवडणुकीत अतिशय पोषक असे वातावरण आहे.ज्येष्ठ नेते बबनराव झांबरे म्हणाले की सामान्य माणसांसाठी कल्याणकारी योजना राबवणारे मा. आ.भीमराव धोंडे एकमेव व्यक्ती आहेत.मतदारांना पुन्हा एकदा धोंडे साहेबांना आमदार करण्याची चांगली संधी आलेली आहे. किशोर खोले यांनी सांगितले की,गेल्या विधानसभा निवडणुकीत आणि लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराला पराभूत करणाऱ्या व्यक्तीला भाजपाने उमेदवारी दिली आहे. माजी सभापती साहेबराव मस्के यांनी सांगितले की भीमराव धोंडे हे एक वटवृक्ष आहेत आपण त्यांच्या पारंब्या आहोत त्यामुळे वटवृक्ष आपल्याला शाबूत ठेवण्यासाठी सर्वांनी अहोरात्र कष्ट करून निवडणूक जिंकायचीच. २०१४ ते २०१९ या काळात आष्टी येथील पोलीस स्टेशनला कमी गुन्हे नोंद झाल्याबद्दल पुरस्कार मिळाला होता. मा. आ. भीमराव धोंडे हे सर्वसामान्य माणसाला चांगली वागणूक देणारे व्यक्तिमत्व आहेत. माजी सरपंच संतोष चव्हाण यांनी सांगितले की मागच्या वेळी जाणीवपूर्वक केलेल्या पराभवाचा बदला घेण्याची नामी संधी आली आहे याचा कार्यकर्त्यांनी आणि मतदारांनी लाभ घ्यावा. याप्रसंगी माजी सरपंच बाळासाहेब पवार, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, रामराव खेडकर,रामदास बडे, नियामत बेग,माऊली पानसंबळ, अशोकराव साळवे,ग्रा.पं.सदस्य बाळासाहेब देशमुख,बबन आनेराव,राजपाल शेंडगे,हरिभाऊ तांदळे,बाबासाहेब गर्जे,बबनराव सांगळे,सरपंच दादासाहेब जगताप व इतरांची भाषणे झाली.या बैठकीस



जि.प.सदस्य सुरेश माळी, दिलीपराव म्हस्के,संभाजी जगताप,विठ्ठलराव बनसोडे , छगनराव तरटे,बजरंग कर्डिले, इंजि.बडे,चेअरमन राजेश धोंडे,ड.खेडकर,माजी सरपंच राहुल जगताप, सरपंच अभय गर्जे,नानाभाऊ वाडेकर, संजय धायगुडे,माजी सरपंच अमोल चौधरी,सरपंच सावता ससाणे,पांडुरंग गावडे,माजी जि. प.सदस्य सतिश झगडे,माजी सरपंच नवनाथ सानप, रावसाहेब लोखंडे,माजी सभापती काकासाहेब लांबरूड, सरपंच ज्ञानेश्वर केदार, बाबा वाघुले, सरपंच ज्ञानेश्वर वाघ,हरिभाऊ जंजिरे,संजय कांकरिया,आस्ताक शेख,विकास वनवे,अंकुश मुंढे,विठ्ठल लांडगे, सदाशिव दिंडे,मोहनराव घुले,सुदाम झिंजुर्के, माजी सभापती अनिल जायभाय,अज्जुभाई शेख, चेअरमन दादासाहेब हजारे,हादि शेख,संदीप नागरगोजे,महाराष्ट्र केसरी सईद चाऊस,चेअरमन अरुण सायकड,बाजीराव वाल्हेकर,बाबुराव कदम व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.सुत्रसंचलन माजी सरपंच बाळासाहेब पवार व डॉ मुश्ताक शेख यांनी केले.

# आघाडीची सत्ता आल्यानंतर मातंग समाजाला चांगले दिवस येतील–भास्करराव पा.खतगावकर





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

गेल्या अनेक वर्षापासून मातंग समाज काँग्रेस सोबत एक निष्ठेने आहे परंतु होत असलेल्या या विधानसभा निवडणुकीत मातंग समाजातून नाराजीचा सूर निघत आहे आपण महाविकास आघाडी बाबत नाराजी व्यक्त करू नये आघाडीची सत्ता आल्यानंतर निश्चितच मातंग समाजाला चांगले दिवस येतील आपण पुढाकार घेऊन चांगली संधी देऊ असा विश्वास माजी खा.भास्करराव पाटील खतगावकर यांनी प्रचार सभेच्या कार्यक्रमात व्यक्त केला.

नायगाव विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाच्या उमेदवार डॉ.मीनल पाटील खतगावकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करून आयोजित जाहीर सभेच्या अध्यक्षस्थानी मा खा.भास्करराव पाटील खतगावकर, जहीराबाद येथील खा.शेटकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार प्रा. रवींद्र वसंतराव चव्हाण, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुनील कदम,नायगाव विधानसभेचे उमेदवार डॉ.मीनल पाटील खतगावकर यासह गणेश तादलापूरकर, गोविंदराव पाटील शिंदीकर,गणेश पाटील करखेलीकर,नागोराव पाटील रोशनगावकर, सुरजित सिंह गिल, केशवराव पाटील चव्हाण श्रीनिवास पाटील खतगावकर संजय बेळगे, रवींद्र पाटील भिलवंडे, हनुमंतराव पाटील चव्हाण, भास्कर पाटील भिलवंडे प्रल्हाद पाटील ईजतगावकर, संभाजी पाटील भिलवंडे, मनोज पाटील मोरे, श्रीनिवास पाटील चव्हाण, धनंजय सूर्यवंशी, रवी पाटील खतगावकर,डि.पी.सांगवीकर, गणेश गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. खतगावकर बोलताना पुढे म्हणाले की,नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार प्रा.रवींद्र चव्हाण यांना बिनविरोध निवडून देण्यासाठी भाजपाने थोडे शहाणपण दाखवायला पाहिजे होते पण ते आपला माणुसकीचा धर्म पाळीत नाहीत,नायगावचे चव्हाण आणि खतगावकर यांचे दुकान पाला मधले नाही तर पर्मनंट दुकान आहे परमनंट दुकानच गॅरंटी देते पाला मधल्या दुकानात गॅरेंटी नसते असा चिमटा घेत बारूळ धरणाचे पाणी हे नायगाव तालुक्याच्या हक्काचे असताना उदगीर जळकोट कडे जाते यावर आ. राजेश पवार काही बोलत नाही असाही त्यांनी टोला लगावला.यावेळी राजू पाटील कदम, शिवराज पाटील वरवटे, बिरादार गुरुजी, जगदीश कदम, प्रताप पाटील जिगळेकर, चंद्रकांत आईलवार यासह मतदार बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. जीवन चव्हाण यांनी मानले.

> **नांदेड बिदर रेल्वे प्रकल्पाबाबत प्रत्येक निवडणुकीत भाजपाने दिशाभूल केली तर तीर्थयात्रा योजनेतही त्यांनी प्रत्येक व्यक्तीला तीस हजार रुपये असताना त्याचा राजेश पवार यांनी गैरवापर केलेला आहे आणि यात्रेकरूची दिशाभूल केली. दीड कोटी रुपयांचे मंगनाळी मुगाव येथील रस्ते दीड वर्षातच टिकले नाहीत, आणि गाव पदाधिकाऱ्यांना डावलून राजेश पवारने कामे केले.**
> **डॉ.मीनल पाटील खतगावकर.**

> **गेल्या तीन पिढ्यापासून आम्ही जनतेसोबत राहणारे आहोत म्हणूनच जनतेने वसंतराव चव्हाण यांना विधानसभा,व लोकसभेत पाठविले होते असे सांगत स्वर्गीय खासदार वसंतराव चव्हाण यांच्या आठवणींना उजाळा दिला. लोकसभा उमेदवार प्रा.रवींद्र चव्हाण.**

# धनत्रयोदशी मुहूर्त साधत बालाजी खतगावकर यांनी उमेदवारी अर्ज भरला

## बाराहाळी नाका ते तहसील कार्यालय पर्यंत मोठे शक्ती प्रदर्शन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

दिनांक २९ ऑक्टोबर रोजी क्रिडा संकुल, बी. एस. एन. एल. ऑफीस, मुखेड येथे नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी भव्य अश्या सभेचे आणि रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून आणि दीपप्रज्वलन करून या सभेची सुरुवात झाली.

मतदान बालाजी पाटील खतगांवकरांच्या निशाणीसमोर करायचे आहे.मतदान निर्भय वातावरणात, प्रेमाच्या वातावरणात, आनंदाच्या वातावरणात करायचे आहे. पण तुम्ही कुठल्याही प्रलोभनाला बळी पडू नका आणि प्रामाणिकपणे मतदान करा. एक सामान्य शेतकऱ्याचा मी मुलगा आहे. परमेश्वराने मला खूप काही ज्ञानाच्या रूपाने दिलं आहे. तुम्ही मला शक्ती द्या. गेल्या तीन-चार महिन्यात मी काय केले आहे याचा पाढाही आपल्यासमोर आलेला आहे. १५ बंधारे



आम्ही मंजूर केलेले आहेत. आता फार विचार करून मतदान करायचे आहे. प्रत्येक गावातून शंभर टक्के मतदान झालं पाहिजे ही माझी आपल्याला विनंती आहे. असे आवाहन - बालाजी पाटील खतगावकर यांनी केले

त्यानंतर भव्य रॅली काढण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या सर्व नागरिकांना बालाजी पाटील खतगावकर यांनी हस्तांदोलन करत त्यांचा आशीर्वाद घेतला व तसेच बाराळी नाका ते तहसील कार्यालयापर्यंत तालुक्यातील मोठा जनसागर उसळला



होता.रॅलीमध्ये, ढोल ताशांच्या गजरात,भजन, करीत सर्व वारकरी संप्रदायातील लोक या रॅलीमध्ये सहभागी होते. तसेच

शेतकरी,शेतमजूर, कामगार, गोरगरीब असंख्य नागरिक उपस्थित होते यावेळी उपस्थित होते. ,

व्यंकटराव पाटील गोजेगावकर, गुणवंत पाटील हंगरगेकर , अशोक पाटील रावीकर बालाजी पाटील कबनूरकर, प्रभाकर पाटील इंगळे, शिवराज मसलगेकर, बालाजी पाटील ढोसणे नारायण गायकवाड, नरबागे, आधी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

---

# हनुमंत पाटील बेटमोगरेकर यांनी भरला उमेदवारी अर्ज

## नांदेड लोकसभा पोट निवडणुकीचे उमेदवार-प्रा.चव्हाण यांची उपस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । प्रतिनिधी**

मुखेड- कंधार विधानसभेसाठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून हनुमंत पाटील बेटमोगरेकर यांनी प्रथमता जाहीर सभा घेऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून यावेळी प्रमुख उपस्थिती नांदेड लोकसभा पोट निवडणुकीचे महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा. रवींद्र पाटील चव्हाण हे होते. व तालुक्यातील महाविकास आघाडीच्या असंख्य कार्यकर्त्या महाविकास आघाडीचे झेंडा,पताके, बेटमोगरेकर यांचे पोस्टर घेऊन रॅलीत असंख्य नागरिक होते ही रॅली शहरातून गाजत,वाजत, ढोल ताशांच्या गजरात शहरातील मुख्य रस्त्याने तहसील कार्यालयापर्यंत भव्यदिव्य रॅली



काढत आपला उमेदवारी अर्ज भरला असून यावेळी तालुक्यातील हजारो नागरिक महाविकास आघाडीचे कार्यकर्ते नेते व पदाधिकारी त्यांची मोठी उपस्थिती होती व तालुक्यातील जनसामान्याचा मोठा प्रभाव दिसून आला यावेळी उपस्थित, काँग्रेसचे नेते श्रावण रॅपनवाढ, बाबू सावकार देबडवार दिलीप पाटील बेटमोगरेकर, शिवाजीराव जाधव, राजू पाटील रावणगावकर , नागनाथ लोखंडे, आधी महाविकास आघाडीचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# कळकावाडी येथे आद्यकवी महर्षी वाल्मिकी महाराज जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

दिनांक २९ऑक्टोबर २०२४ वार मंगळवार रोजी अद्यकवी महर्षी वाल्मिकी जयंती मौजे कळकावाडी ता.कंधार जि.नांदेड येथे बहुजन कार्यकर्त्यासह प्रमुख अतिथी म्हणून माधव पुनवाड यांनी जयंतीला उपस्थित राहून समाज बांधवांना मार्गदर्शन केले .एकजुट राहिल्यास व तसेच समाजाच्या अभ्यासू व प्रामाणिक काम करणाऱ्या नेतृत्वाला काम करण्याची संधी दिल्यास नक्कीच समाजात बदल होतात, समाजाचे प्रश्न नक्कीच सुटतात त्यासाठी आपली एकी कशी महत्त्वाची आहे यावर सखोल मार्गदर्शन केले .त्याप्रसंगी त्यांच्या सोबत उपस्थित ज्येष्ठ मार्गदर्शक प्राध्यापक वामनराव श्रीमंगले सर, कळका नगरीचे उपसरपंच मा.राजू पाटील गायकवाड मा.काशिनाथ मामा मिरेवाड, पुनवाड यांचे



विश्वासू सहकारी तिरुपती पुटवाड ह भ प ज्ञानेश्वर महाराज मिरेवाड मा.बालाजीमामा मिरेवाड , मा.उत्तम गुरुजी मंगनाळी, मा.व्यंकटी पाटील , मा.विठ्ठल पाटील गायकवाड, मा.विठ्ठल विभूते , मा.निवृत्ती पुटवाड, मा.बळीराम विभुते, मा.ज्ञानेश्वर केंद्रे मा.सुर्यभान मिरेवाड मा.पंढरीनाथ महाराज मिरेवाड मा.सुनील मिरेवाड मा.केशव पुटवाड मा.शंकर मिरेवाड मा.गणेश कागदेवाड मा. ज्ञानेश्वर गाडेकर, मा.मारुती कागदेवाड मा.दिगांबर कागदेवाड (ग्रामपंचायत सदस्य) मा. बाबुराव कागदेवाड, मा.संदीप मिरेवाड ,मा.शंकर मिरेवाड ,मा.केशव पुटवाड मा.उमाकांत मिरेवाड मा.ज्ञानेश्वर मिरेवाड यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक मान्यवर माता भगिनी व आदिवासी कोळी महादेव समाज बांधवांसह बहुजन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते राहुल जगताप यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

हकारातील एक नाव स्व. कुंडलीकरावजी जगताप यांचा राजकीय वसा घेऊन स्व.तात्यांच्या हातांवर हात मारुन तालुक्यातील जनतेला नेहमीच न्याय देण्याची भुमीका असलेल्या राहुल जगताप यांनी आज आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला या वेळी संपूर्ण तालुक्यातुन प्रचंड असा जनसागर उसळला होता अर्ज दाखल करुन श्रीगोंद्याचे ग्रामदैवत संत श्री शेख महंमद महाराज येथील प्रांगणात जाहीर सभा घेऊन प्रचाराचा नारळ फोडला यावेळी बोलताना



जगताप म्हणाले की मी उमेदवारी फक्त समोर बसलेल्या मावळ्यांच्या मदतीने लढणार आहे कारणं समोरचे उमेदवार सर्वच पैशावाले उभे आहेत कारण एकाला एनसीडीसीचे १२० कोटींचे कर्ज मिळाले आहे तो पैसा ते आता बाहेर काढणार आहेत तर दुसरीकडे तालुक्यातील विकास कामातून लाखोंची माया गोळा केलेली आहे ते सुद्धा पैशाचा पाऊस पाडणार आहेत जगताप पुढे म्हणाले की मला कुठल्याही पक्षाचे कवच नाही आता तालुक्यातिल जणता हिच माझे कवच आहे तिकीटाची किंमती पेक्षा जणते कडुन मला मिळालेली किंमत खुप मोठी आहे आणि याचं मतदार मायबापांच्या मदतीने ही निवडणूक लढविणार आहे आणि जिंकणार सुध्दा आहे असे जगताप म्हणाले मी स्व.शिवाजीबाप्पु नागवडे यांच्या विचारांना कधीच विसरणार नाही बाप्पुंच्या विचारांचा वारसदार खरा मीच आहे असेही जगताप यांनी सांगितले यावेळी अतुल लोखंडे दिपक पाटील भोसले उत्तमराव डाके अकतार शेख राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष हरीदास शिर्के संभाजी देविकर सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे माजी उपाध्यक्ष जेष्ठ नेते बाबासाहेब इथापे केशवभाऊ मगर यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

---

# नागपूर-यवतमाळ हायवेवर अपघात: भरधाव ट्रकच्या धडकेत बिबट्या वाघाचा मृत्यू

लोकनेता न्यूज नेटवर्क। केळझर । प्रतिनिधी

सकाळी सुमारे ५.५० वाजता नागपूर-यवतमाळ हायवेवर केळझर येथे एक दुर्दैवी अपघात घडला. भरधाव ट्रकच्या धडकेत एक बिबट्या वाघ जागीच ठार झाला. हा अपघात वन विभागाच्या जंगला केलेल्या कपाऊड बैटरी करंट तारांच्या कारणामुळे झाला.

हायवेच्या कडेला असलेल्या जंगलात लावलेल्या तारांनी अचानक खाली पडल्यानंतर जंगली प्राणी बाहेर पडले, ज्यामुळे हा अपघात घडला. जर ही तार व्यवस्थित असती, तर जंगलातले प्राणी बाहेर येणार नसते आणि हा अपघात टाळला गेला असता. बिबट्या वाघाचा अपघात गावच्या शेजारी झाला असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. जंगली प्राणी गावात येण्याचे लक्षात आले आहे, त्यामुळे गावकऱ्यांमध्ये चिंतेचा माहौल आहे. वन विभागाने या अपघाताची गंभीर दखल घेतली पाहिजे आणि भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

---

# उस्माननगर पोलिसांनी दोन दरोडे खोरांच्या आवळल्या मुसक्या

## गावठी कट्टा,दोन जिवंत काडतुस,तीन तलवारी जप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । वृत्तसंस्था**

अवैद्यधंदे व जबरी चोरी मधील आरोपीचा शोध घेण्यासाठी रात्रगस्तीवर असलेल्या उस्मानगर पोलिसांनी दरोड्याच्या तयारीत असलेल्या दोघांना ताब्यात घेतले असून, अन्य चार आरोपी फरार झाले आहेत.अबिनाशकुमार पोलीस अधिक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत अवैद्यधंदे व जबरी चोरी मधील आरोपीचा शोध घेवून त्याचे विरूध्द कार्यवाही करणेबाबत सहा. पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार पो. स्टे उस्माननगर यांना आदेश दिले होते. त्यावरून दि.२७/१०/२०२४ रोजी मा.स.पो.नि चंद्रकांत पवार यांचे आदेशाने पोलीस उप निरीक्षक गजानन गाडेकर, पो.उप.नि सुनिल सुर्यवंशी पोलीस अंमलदार पोहेकॉ. रेजितवाड, पोहेकॉ. शिवपुजे पोहेकॉ. कुबडे चालक पोकॉ.बलवान कांबळे, पोकॉ. अनिरुध्द वाडे, पोकॉ. मगदुम शेख पो.स्टे उस्माननगर हे त्यांचे टिम मधील अंमलदार याना सोबत पो. स्टे हाद्दीत रात्री ७ वाजता पेट्रोलिंग करताना गुप्त माहिती मिळाली.

यावरून बामणी फाटा परिसरात कलंबर (खु) ते बारूळ जाणारे रोडलगत जंगलात पाच ते सहा इसम दरोडा टाकण्याच्या इराद्याने अंधारात दबा धरून बसलेले असुन ते अग्निशस्व व घातक शस्त्र बाळगून आहेत. या माहिती प्रमाणे सदर ठिकाणी २०.३० वा छापा टाकला असता पाच ते सहा इसम आम्हाला पाहून पळू लागले. तेव्हा त्यांचा पाठलाग करून दोघांना पकडले व चार जण अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. पकडलेले दोघांना त्यांचे नाव गाव विचारले असता प्रदीपसिंग विजयसिंग खालसा वय २४ वर्षे रा. खुरसाळे हॉस्पीटल जवळ, यात्री निवास रोड, नांदेड, ओमकार शेषेराव मुदीराज वय २३ वर्षे रा. सकोजी नगर, नांदेड असे सांगितले.त्यांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यात एक लोखंडी गावठी कट्टा (पिस्टल) व दोन जिवंत काडतूस व तीन लोखंडी तलवारी दोन मोबाईल एक मोटार सायकल असा एकूण ८५,५००/-रू मुद्देमाल मिळून आला सदरचा मुद्देमाल दोन पंचासमक्ष जप्त केला आहे. म्हणुन सदर आरोपी विरूध्द पोलीस ठाणे उस्माननगर ता. कंधार गुरनं १९४/२०२४ कलम ३१०(४),३१०(५) भा. न्या. सं.सह कलम ४/२५,३/२५ भा ह का १९५९ प्रमाणे दाखल करून सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप. निरीक्षक गजानन गाडेकर हे करीत आहेत. पो.स्टे. उस्माननगर येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याबद्दल अबिनाशकुमार पोलीस अधिक्षक नांदेड यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

हि कामगिरी अबिनाश कुमार, पोलीस अधिक्षक नांदेड, खंडेराय धरणे, अप्पर पोलीस अधिक्षक भोकर, सुरज गुरव, अप्पर पोलीस अधिक्षक नांदेड, श्रीमती अश्विनी जगताप, उप. विभागीय पोलीस अधिकारी उप. विभाग कंधार यांचे मार्गदर्शनाखाली चंद्रकांत पवार सहा. पोलीस निरीक्षक, गजानन गाडेकर पो उप.नि, सुनिल सुर्यवंशी, पोलीस अंमलदार पो.हे. कॉ/२११९ रेजितवाड, पो. हे. कॉ/५८२ शिवपुजे पो.हे. कॉ, ८५१ कुबडे चालक पो. कॉ/२६६७ बलवान कांबळे, पो.कॉ/ ३३० अनिरुध्द वाडे, पो.कॉ/ २९९८ मगदुम शेख पोलीस ठाणे उस्माननगर यांनी करून एक लोखंडी गावठी कट्टा (पिस्टल) मॅंगजिन सह, दोन जिवंत काडतुस, तीन तलवार दोन मोबाईल, एक मोटार सायकल व दोरी असा एकूण ८५,५००/-रू मुद्देमाल जप्त केला आहे.



# धक्कादायक ! कुंपण च शेत खाऊ लागले,प्रा.आ.केंद्र सुलेमान देवळा येथील नवीन पाणी फिल्टर कर्मचाऱ्याने केला लंपास

## कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करुन निलंबित करावे नसता आंदोलन-परमेश्वर घोडके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्रा.आ.केंद्रात नागरिकांच्या आरोग्यासाठी त्यांना स्वच्छ पाणी मिळावे म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्रात शासकीय कोट्यातून खरेदी केलेले पाणी फिल्टर बसविण्यात आले होते परंतु कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्यानी ते फिल्टर चोरून नेल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, कर्मचारी जर वस्तू परस्पर लंपास करीत असल्याची लेखी तक्रार सुलेमान देवळा गावातील समाजसेवक श्री.परमेश्वर घोडके यांनी आरोग्य विभागाचे डॉ.सौ.शुभांगी पैठने व डॉक्टर शेख मॅडम यांच्याकडे केली आहे .

सविस्तर माहिती अशी की,आष्टी तालुक्यातील सर्वात मोठी प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने स्थानिक आरोग्य समितीच्या निधीतून,कागदपत्रे अनेक वस्तू खरेदी केला असून, प्रथम दर्शनी कोणतेही वस्तू आज आरोग्य केंद्रात नाहीत. पाणी फिल्टर विषयी चौकशी केली असता अशी माहिती भेटली की,सदर पाणी फिल्टर दवाखान्यातील एका कर्मचाऱ्यांच्या घरी नेऊन बसवण्यात आले आहे. डॉक्टर पैठणे मॅडम व कर्मचारी क्लार्क/सुपरवायझर श्री.सानप यांच्या संगमताने, दवाखान्यातील अनेक शासकीय औषधे,खाट, गादी, व अन्य औषधाची बाहेर विकी होते का? हा सुद्धा संशय व्यक्त होत आहे.सदर दोन्ही कर्मचारी. व दोन्ही अधिकाऱ्यांचा संगमत असून, प्राथमिक आरोग्य केंद्र सुलेमान देवळा केंद्राचा कारभार रामभरोशे आहे. रुग्णांना स्वच्छ पाणी देण्याचे पाणी फिल्टर जर कर्मचारी घरी वापरत असतील




तर जनतेने न्याय मागायचा कोणाकडे ? हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. याविषयी जाब विचारण्यासाठी समाजसेवक श्री.परमेश्वर घोडके गेले असता, उद्धटपणाची वागणूक देत,कायद्यात तुम्हाला खोट्या केस मध्ये गुंतवू अशी धमकी कर्मचारी देत आहेत.संबंधित पाणी फिल्टर नेहणाऱ्या कर्मचारांवर डॉक्टर शुभांगी पैठणे त्या भुरट्या कर्मचाऱ्यावर कारवाई करणार का?असा प्रश्न उपस्थित केला आहे, आरोग्य केंद्राची इमारत नवीन होणे अपेक्षित असताना सुद्धा ती न होता उलट आहेत ते साहित्य गायब करण्यास कर्मचारीसह गावातील जिम्मेदार नागरिक सक्रिय झाले आहेत.नविन ईमारत बांधकाम होण्यासाठी आमरण उपोषण करणाऱ्यारे श्री.परमेश्वर घोडके वर जर ही वेळ येने खूप खेदांची गोष्ट आहे. आठ दिवसात पाणी फिल्टर दवाखान्यात बसून, संबंधित कर्मचारांवर कारवाई न झाल्यास दि. ५/११ /२०२४ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रात सुलेमान देवळा या ठिकाणी लोकशाही पद्धतीने आंदोलन केले जाईल असा इशारा दिलेल्या निवेदनात समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी दिला आहे.

**तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.तांदळे यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ न शकल्याने त्यांची बाजू समजली नाही**

# श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी म.पेठवडज गावासाठी ठरतेय आधारस्तंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

पेठवडज येथील श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या अध्यक्षा सुनिता अशोकराव पाटील डावकोरे व अशोकराव डावकोरे साहेब यांनी गावातील नागरिकांसाठी सोसायटीच्या माध्यमातून जनसेवा हीच ईश्वर सेवा मानून गावात अनेक उपक्रम राबविले प्रामुख्याने स्वच्छता उपक्रम राबविला.बारूळ ते वरवंट रस्त्याची दुरुस्ती करून दिली त्यामुळे गावात बस सुरू झाली..सोसायटी चा सदस्य मयत झाला तर त्याला ११००० हजार रुपयाची मदत करून त्याच्या कुटुंबाला आधार दिला जातो. विद्यार्थ्यांसाठी अभ्यास केंद्र सुरू करण्यात आले असून त्याचा लाभ गावातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींना होत आहे.लवकरच पेठवडज येथे प्रा.गणेश शिंदे सरांचे व्याख्यान श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित केले जाणार असून गावातील नागरिकांना शिंदे सरांचे व्याख्यान ऐकायला मिळणार



आहे.अशोकराव डावकोरे साहेब यांचे कार्य हे निवडणूक लढविण्यासाठी नसून किंवा त्यांना खुर्चीची गरज नसून कींवा खुर्ची जायची भीती नसून फक्त त्यांनी व त्यांच्या सुविद्य पत्नी यांनी श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या माध्यमातून जनसेवेचा वसा हाती घेतलेला आहे.अशोकराव डावकोरे साहेब पेठवडज नगरीला रत्न सापडले असून ते पेठवडज नगरीच्या जनतेनी जतन केले पाहिजे.ते जनसेवा हीच ईश्वर सेवा मानून गावात कार्य करीत आहेत त्यांच्या कार्याला मानाचा मुजरा.श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीला खूप खूप शुभेच्छा.

# हम लडेंगे भी और जितेंगे भी;विजय संकल्प रॅलीत आशाताईंचा शिंदे यांचा निर्धार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा कंधार विधानसभा मतदार संघासाठी आशाताई शिंदे यांनी मंगळवारी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने जोरदार शक्ती प्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आयोजित भव्य जाहीर सभेत त्या बोलत होत्या. शेकापचे राष्ट्रीय नेते भाई जयंत पाटील, आमदार श्यामसुंदर शिंदे, लोहा बाजार समितीचे सभापती विक्रांतदादा शिंदे, अनुजाताई शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. शनिमंदिर येथून मंगळवारी दुपारी शेकाप, महा विकास आघाडीकडून भव्य विजय संकल्प रॅली काढून आशाताई शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.



अर्ज भरल्यानंतर आयोजित भव्य सभेत आशाताईंनी माजी खासदार व महायुतीचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांचे नाव न घेता त्यांच्यावर आसूड ओढले. पुढे बोलताना त्यांनी राज्य सरकारने निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहिण योजना आणली, पण लाडक्या बहिणीच्या सुरक्षतेकडे सरकारचे दुर्लक्ष झाल्याचे सांगितले. बेरोजगारी वाढली. महागाई वाढली. शेतकऱ्यांच्या योजना बंद करण्यात आल्याचेही त्यांनी म्हंटले.भाई जयंत पाटील म्हणाले की, मला जे २५ वर्षात जमले नाही ते आमदार शिंदेंनी पाच वर्षात करून दाखविले. २४०० कोटी चा विकास निधी आणणारा आमदार म्हणजे श्यामसुंदर शिंदे आहेत. शिंदेंनी आमदार म्हणून काम केले. पण आशाताईंनी आमदारकी चालवली. जो भाऊ स्वतःच्या बहिणीला सांभाळू शकत नाही. तो तुम्हाला कसा काय सांभाळू शकेल, असे स्पष्ट करून त्यांनी आशाताई महविकस आघाडीच्या उमेदवार आहेत. त्यांना निवडून द्या. त्या प्रभावी आमदार म्हणून विधिमंडळात काम करतील, असा विश्वास व्यक्त केला. आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, मतदारसंघाच्या विकासासाठी मी अहोरात्र प्रयत्न केला. आशाताईंना भरघोस मतांनी विजयी करा. पुढील काळात आशाताई लोहा कंधार मतदारसंघ शिखरावर घेऊन जातील. माझा मेव्हण्याने आपल्या बहिणीलाच आव्हान दिले आहे. त्याने लाज शरम विकून खाली. त्याच्या भूलथापांना बळी पडू नका. अफवांवर विश्वास ठेवू नका. आशाताईंना विजयी करा, असे आवाहन ही त्यांनी केले. यावेळी मतदारसंघातील हजारो महिला पुरुष उपस्थित होते.



८८- कंधार लोहा विधानसभा मतदारसंघातून संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार भगनुरे पाटील यांनी अपक्ष उमेदवार प्रकाश भगनुरे पाटील आवेदन पत्र दाखल करण्यात आले. यावेळी शेतकरी कष्टकरी तळागाळातील सर्वसामान्य माणूस पाठीमागे खंबीरपणे सोबत होता.




भारतीय जनता पार्टी महायुतीचे नांदेड लोकसभा उमेदवार संतुकराव हंबर्डे यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी लोककल्याणकरी शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी स्वता:उपस्थित होते. याला म्हणतात पक्षाचे पालन करणारा नेता गुरूजीचा आम्हाला अभिमान आहे.द ग्रेट कवळे गुरूजी.

# प्रचंड शक्ती प्रदर्शन करत नागवंशी संघपाल पनाड यांचा उमेदवारी अर्ज दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

सर्वप्रथम संत गजानन महाराज, पंचपिर दर्गा, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्थळांना वंदन करून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सुरुवात करण्यात आली.मेहकर लोणार मतदार संघातून प्रचंड मायबाप जनता उपस्थित झाली होती.यावेळी सर्व समजाचे, धर्माचे, पंथाचे, कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी एकच जयघोष करत गर्जना केली एकच वादा नागवंशी संघपाल दादा संघपाल दादा म्हणजेच मेहकर मतदार संघाचा विकास अशा घोषणेने संपूर्ण मेहकर शहर दणाणून सोडले,यावेळी अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आपले मत मांडले त्यामध्ये युवा नेते अनित्य घेवंदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की नागवंशी संघपाल पनाड यांना घराघरात पोहोचण्याची जबाबदारी आपली आहे. आपणच आपला विकास करण्यासाठी





या उमेदवारांना उभे केले आहे त्यासाठी सर्वांना आपल्या उमेदवाराचे नाव चिन्ह आणि पक्ष हे कसे घराघरात पोहोचेल त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, येणारा काळ हा आपलाच आहे परंतु आपल्यावर आरोप प्रत्यारोप आरोप होतील, त्याला कुठेही बळी न पडता सर्वांनी नागवंशी संघपाल पनाड यांना ना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे.उपस्थितामध्ये तोफीक अली, अख्तर भाई, शाकीर भाई पठाण, बळीभाऊ मोरे,फेरोज गवळी,संतोष भाऊ शिंदे संतोष,सद्दाम भाई,पाटील, गणेश भानापुरे शाकीरभाई पठाण दीपक भाऊ आंभोरे ,महेंद्र मोरे, नागसेन पनाड, महेंद्र पनाड, निळकंठ गवई, रमेश पवार,प्रदिप सानप, अनिल पवार,अनिल आनंदराव,शुध्दोधन सरदार, बिंबीसार पनाड, प्रसेंजीत पनाड,संजय शेजुळ,महेश मोरे, सागर पनाड, विशाल पनाड,राजहंस जावळे, संदेश पनाड, दादाराव पनाड ,राहुल साळवे,रंजीत मोरे विलास खरात, बाळु मोरे, तुळशीराम पनाड, वंशीळाबाई पनाड, सुमनबाई पनाड,सिंधुबाबाई पनाड,हरनाबाई चव्हाण,पाडमुख बाई,नंदाबाई पनाड, कमलबाई पनाड,विजय माला गवई, रूक्मिणीबाई पनाड,केसरबाई गवई,सर्व मायबाप जनतेचे आभार मानले,की माझ्या एकावर हाकेवर आपण या ठिकाणी उपस्थित झालात त्याबद्दल मी मनाच्या गाभाऱ्यातून सर्वांना धन्यवाद देतो तुम्ही माझ्यावर जो विश्वास टाकला आहे त्याला कुठेही तडा न जाऊ देता, मी मतदार संघाचा चेहरा मोरा बदलल्याशिवाय मी थांबणार नाही अशी भावना व्यक्त केली.यावेळी महिला पुरुष कार्यकर्ते सर्व समाजाचे नेतेमंडळी उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904